1) पुण्यनगरी पू. पान क्र. 1

दि. 14/01/2023

# राजस्थानमधील सराईत दुचाकी चोर गजाआड



**नालासोपारा :** दुचाकी वाहने चोरी करणाऱ्या ४ गुन्ह्यांमध्ये सक्रिय असणाऱ्या राजस्थान राज्यातील सराईत आरोपींना जेरबंद करण्यात पेल्हार पोलिसांना यश आले आहे. या आरोपीकडून चार मोटारसायकली जप्त करण्यात आल्या आहेत

वसई-विरारमध्ये वाहन चोरी, सोनसाखळी चोरी, घरफोडी यांसारखे प्रकार वारंवार घडत असल्याचे समोर येत आहे. काही दिवसांपूर्वी वसई पूर्वेतील वाकनपाडा परिसरात मोटारसायकल चोरी झाल्याची घटना घडली होती. या गुन्ह्याची गंभीर दखल घेत वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आदेशावरून आरोपीची गुन्हे करण्याची कार्यपद्धती, उपलब्ध सीसीटीव्ही फुटेज आणि बातमीदाराने दिलेल्या माहितीवरून पेल्हार पोलिसांनी आरोपींना ताब्यात घेतले आहे. आरोपींची नावे अनिल कुमार विष्णूई (२३) आणि रामाराम सुतार (२४) अशी असून त्यांच्याकडून चार गुन्ह्यांतील दोन अॅक्टिव्हा, दोन युनिकॉर्न मोटारसायकली असा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. ही कामगिरी परिमंडळ-३ चे पोलीस उपायुक्त सुहास बावचे, सहाय्यक पोलीस आयुक्त रामचंद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पथकाने केली आहे.

2) म. टा. पू. पान क्र. 1

# विम्याच्या नावे गंडा; टोळीचा पर्दाफाश

**म. टा. वृत्तसेवा, मिरा-भाईंदर**

विम्याचे नूतनीकरण करून देण्याच्या नावाखाली फसवणूक करणाऱ्या टोळीचा मिरा-भाईंदर पोलिसांच्या गुन्हे शाखेने पर्दाफाश केला आहे. या टोळीने मिरा रोडमध्ये एक खोली भाड्याने घेत तेथून कामकाज चालवले होते. या प्रकरणी तिघांना अटक करत, काशिमिरा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

काशिमिरा पोलिस ठाण्याच्या हद्दीत डीबी ओझेन सोसायटीतील एका खोलीत काही जण नामांकित विमा कंपन्यांच्या नावे नागरिकांशी संपर्क साधून आर्थिक फसवणूक करत असल्याची माहिती गुप्त बातमीदारांकडून मिळाल्याने पोलिस आयुक्त मधुकर पांडे यांनी

## गुन्हे शाखेकडून तिघांना अटक

कारवाईचे आदेश दिले होते. त्यानुसार गुन्हे शाखेने प्राप्त माहितीआधारे छापा टाकून कारवाई केली. यावेळी खोलीत आढळलेले सलीम सिद्दिकी (२४), चांद अहमद (२६) व मोहम्मद अफताब शेख (२२) या तिघांना ताब्यात घेण्यात आले. एक लॅपटॉप, १० मोबाइल, १० डेबिट कार्ड, चेकबुक, पासबुक, तीन आधार कार्ड अशी सामग्री जप्त करण्यात आली. या प्रकरणी काशिमिरा पोलिस ठाण्यात तिघांविरोधात विविध कलमांतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. न्यायालयाने त्यांना १६ जानेवारीपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे. अटकेतील आरोपींचा माणिकपूर व मुंबईतील खेरवाडी पोलिस ठाण्यात दाखल गुन्ह्यांमध्येही सहभाग आहे.

**४० जणांची फसवणूक**

अटकेतील तिघेही तरुण यापूर्वी नामांकित विमा कंपन्यांमध्ये काम करत होते. त्यावेळी त्यांनी काही ग्राहकांची माहिती मिळवली. त्यानंतर ते काम सोडून, एक खोली भाड्याने घेऊन तेथून ग्राहकांना गंडा घालत होते. या तिघांनी राज्यभरातील ४०हून अधिक जणांची फसवणूक केल्याचे प्राथमिक तपासात समोर आल्याची माहिती गुन्हे शाखेचे उपायुक्त अविनाश अंबुरे यांनी दिली.

CamScanner

३) पूण्यनगरी पान क्र. १

दि. १४/०१/२०२३

# आता गुन्हेगारांची नव्हे, पोलिसांचीच दहशत राहणार - उपमुख्यमंत्री

## वसुलीभाईंच्या विरोधात पुढे येण्याचे उद्योजकांना आवाहन

**पुणे** : राज्यात मोठ्या प्रमाणात उद्योग व्यवसाय येऊ घातले आहेत. महाराष्ट्र सरकार याबाबत नवीन धोरण आणणार असून उद्योजक व व्यावसायिकांनी वसुलीभाईंना घाबरू नये. याबाबत मला स्वतः मेसेज पाठवावा. याबाबत कोणाचेही नाव पुढे येणार नाही, याची काळजी घेतली जाणार असून यापुढे दहशत ही गुन्हेगारांची नाही, तर केवळ पोलिसांचीच राहणार आहे, अशी ग्वाही राज्याचे उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. बंडगार्डन रस्त्यावरील एका हॉटेलमधील कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी त्यांनी पुण्याच्या सर्वांगीण विकासाबाबत विस्तृत विवेचन त्यांनी केले.

उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, भारतात जी-२० परिषदेच्या निमित्ताने अनेक उद्योग व व्यवसाय हे पुण्यात येत आहेत. त्यानुसार पुण्याची उभारणी करण्याची तयारी सुरू आहे. देशातील सर्व महानगरांमध्ये सर्वात वेगाने वाढणाऱ्या पुण्याच्या समस्यांचा गुंता सोडवण्यासाठी आम्ही बांधील असल्याचेही नमूद केले. कोयता गँगची सध्या पुण्यात दहशत आहे. याबाबत सर्व माहिती घेण्याचे काम सुरू आहे. दहशतीबाबत वेळीच आता वेगळे पाऊल उचलण्यात



येणार आहे. याशिवाय पुण्यात माथाडीच्या नावाखाली होत असलेली वसुलीही थांबवण्यात येणार आहे. एकदा राज्यातून वसुलीभाईंमुळे उद्योग बाहेर गेले तर मोठी अडचण होणार आहे. कोणत्याही प्रकारची दहशत खपवून घेतली जाणार नाही. सरकारच्या कामाबाबत ते म्हणाले, अडीच वर्षांत राज्यातील विकासाला खिळ बसली होती. आमचे सरकार हे गतिमान असून त्यानुसार काम करत आहे. वाहतूक, कचरा याबाबतही पुढील काळात मोठे निर्णय घेतले जाणार आहेत. पुण्यातील मेट्रोच्या पहिल्या टप्प्याचे काम अंतिम टप्प्यात आहे. पुण्याची मेट्रो आता धावू लागली आहे. तर कचरा डेपोचा प्रश्न निकाली निघाला आहे. शहराच्या वाढत्या विस्ताराबरोबर आता सायबर ▸▸ पान ७ वर...

### आम्ही कोणाचेही गणित बिघडवलेले नाही

नाशिक विभाग पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत सत्यजित तांबे यांच्या अपक्ष उमेदवारी अर्जाबाबत पत्रकारांनी विचारणा केली असता देवेंद्र फडणवीस म्हणाले, आम्ही कोणाचेही गणित बिघडवलेले नाही. ही जागा महाविकास आघाडीकडून काँग्रेस पक्षाला सोडण्यात आली होती. त्यानुसार काँग्रेसने सुधीर तांबे यांना उमेदवारी जाहीर केली होती. मात्र सुधीर तांबे यांच्याऐवजी पुत्र सत्यजित तांबे यांनी अर्ज दाखल केला आहे. भाजपच्या कोणत्याही नेत्याशी तांबे यांनी चर्चा केली नाही. तसेच सत्यजित तांबे यांचे काम चांगले आहे, असेही फडणवीस यांनी नमूद केले.

## आता गुन्हेगारांची नव्हे, पोलिसांचीच दहशत राहणार - उपमुख्यमंत्री

(पान १ वरून) गुन्ह्यांत वाढ होत आहे. सायबर गुन्ह्यांची उकल होण्यासाठी आणि फसवणूक झालेल्या व्यक्तीला रक्कम मिळवताना अनेक अडचणी येत आहेत. हा काळ कमी करण्यावर आता भर असणार आहे. पुण्यात उच्च न्यायालयाचे खंडपीठ होण्याबाबतही अनेक वर्षांची मागणी आहे. याबाबतचा निर्णय हा न्यायप्रविष्ट आहे, असेही फडणवीस यांनी सांगितले.

४) सकाळ पान क्र. ४

# वसईत लाच घेणारे दोन पोलिस अटकेत

## तीन दिवसांच्या कोठडीत रवानगी

नालासोपारा, ता. १३ (बातमीदार) : गुन्ह्यात अटक न करण्यासाठी २० हजारांची लाच मागितल्याप्रकरणी आचोळा पोलिस ठाण्याच्या दोन हवालदारांना गुरुवारी (ता. १२) रंगेहात पकडण्यात आले. लाचलुचपत प्रतिबंधक पथकाच्या ठाणे पथकाच्या कारवाईत दोन्ही हवालदारांविरोधात कर्तव्यावर असणाऱ्या त्याच आचोळा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करून त्यांना अटक करण्यात आली आहे. त्यांना आज (ता. १३) वसई न्यायालयात हजर केले असता तीन दिवसांची पोलिस कोठडी सुनावण्यात आली.

योगेश गोकुळ देवरे (वय ३६), जितेंद्र मधुकर बनसोडे (वय ३५) हे आचोळा पोलिस ठाण्यात कार्यरत होते. याच पोलिस ठाण्यात दाखल असलेल्या गुन्ह्यात अटक न करण्यासाठी फिर्यादीला त्यांनी २० हजारांची लाच मागितली होती. या प्रकरणी ठाणे लाचलुचपत विभागाकडे तक्रार दाखल झाली होती. अधिकाऱ्यांनी गुरुवारी (ता. १२) पडताळणी केली असता लाचेच्या संदर्भात बोलणी करून, ती स्वीकारण्याची तयारी दर्शविली असता दोघांना रंगेहात पकडण्यात आले, असे सांगण्यात आले.

CamScanner

दि. 14/01/2023


5) लोकमत पान क्र. 5

# अभिनेता शिजानचा जामीन न्यायालयाने फेटाळला

## शिजानच्या आईला आरोपी बनविण्याची तुनीषाच्या कुटुंबाची मागणी

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** टीव्ही अभिनेत्री तुनीषा शर्मा आत्महत्येतील आरोपी शिजान खानचा जामीन वसई न्यायालयाने शुक्रवारी फेटाळला. तुनिषाच्या कुटुंबीयांनी शिजानच्या आईलाही या प्रकरणात आरोपी बनवण्याची मागणी पोलिस आयुक्तांकडे केल्याचे सूत्रांनी सांगितले.



जामीन अर्ज फेटाळण्यात आल्याने त्याचे वकील मंगळवारी उच्च न्यायालयात जामिनासाठी अर्ज करणार आहेत. याशिवाय तुनीषाच्या कुटुंबीयांनी मीरा-भाईंदर, वसई-विरारचे पोलिस आयुक्त मधुकर पांडेय यांची भेट घेऊन त्यांना निवेदन दिले. त्यात शिजानच्या आईला या प्रकरणात आरोपी बनवण्याची मागणी करण्यात आल्याचे सूत्रांकडून कळते. त्याच्या आईविरोधात दिलेल्या तक्रारीची चौकशी करण्याचे आदेश आयुक्तांनी वालीव पोलिसांना दिल्याचेही सांगण्यात येते.

### या कारणांमुळे फेटाळला जामीन

१. तुनीषा आणि शिजान रिलेशनशिपमध्ये असल्याचे वसई न्यायालयाने मान्य केले. १५ डिसेंबरला दोघांचे ब्रेकअप झाले. त्यामुळे १६ डिसेंबरला तुनीषाला पॅनिक अटॅक आला होता. २४ डिसेंबरला तुनीषाने आत्महत्या केली, तेव्हा शिजान हा तुनीषाला भेटणारी शेवटची व्यक्ती होती. सीसीटीव्ही फुटेजमध्येही या गोष्टीची पुष्टी झाली आहे.

२. ब्रेकअपनंतर तुनीषा नैराश्यात असल्याचेही कोर्टाने मान्य केले. आत्महत्येपूर्वी तुनीषा शिजानच्या खोलीत होती.

३. तपासाच्या या टप्प्यावर जामीन मंजूर झाल्यास प्रकरणावर परिणाम होऊ शकतो. या सर्व परिस्थितीचा तपास करणे आवश्यक असल्याने वसई न्यायालयाने शिजानचा जामीन शुक्रवारी फेटाळला आहे.

6) लोकसत्ता पान क्र. 5

### तुनिशा शर्मा आत्महत्या प्रकरण

# शिझानच्या आईलाही आरोपी करण्याची मागणी

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** अभिनेत्री तुनिशा शर्मा आत्महत्येप्रकरणी आरोपी शिझान खान याचा जामीन अर्ज शुक्रवारी वसई सत्र न्यायालयाने फेटाळल्याने त्याचा न्यायालयीन कोठडीतील मुक्काम वाढला आहे. आता जामिनासाठी सोमवारी उच्च न्यायालयात शिझानच्या वकिलांमार्फत दाद मागितली जाणार आहे. दरम्यान, या प्रकरणात शिझानच्या आईची भूमिका संशयास्पद असून तिला देखील आरोपी बनवण्याची मागणी तुनिशाच्या वकिलांनी केली.

तुनिशा शर्मा आत्महत्याप्रकरणी अटकेत असलेल्या शिझान खानच्या जामीन अर्जावर शुक्रवारी पुन्हा सुनावणी झाली. तुनिशाला शेवटचा भेटणारा व्यक्ती शिझान होता त्यामुळे तपासावर परिणाम होणार असल्याने त्याला जामीन देऊ नये, असा युक्तिवाद तुनिशाचे वकील तरुण शर्मा यांनी केला. न्यायालयाने तो मान्य करत जामीन अर्ज फेटाळला. या निर्णयाला आव्हान देत जामिनासाठी सोमवारी उच्च न्यायालयात अर्ज करणार असल्याचे शिझानचे वकील शैलेंद्र मिश्रा यांनी सांगितले.

तुनिशा आत्महत्येपूर्वी जे औषध घेत होती त्यामुळेच ती अधिक नैराश्यात गेली आणि आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलले. हे औषध शिझानच्या आईच्या सांगण्यावरून ती घेत होती. तसेच आत्महत्येपूर्वी शिझानच्या आईने तुनिशाला दूरध्वनी केला होता, असे तुनिशाचे वकील तरुण शर्मा यांनी सांगितले. शिझानच्या आईची भूमिका संशयास्पद असून तिला या गुन्ह्यात सहआरोपी करावे, असे वकिलांनी सांगितले.

CamScanner

दि. १४/०१/२०२३

७) पुण्यनगरी पान क्र. ३

८) लोकमत पान क्र.३



# महाराष्ट्र पोलीस दल देशात सर्वोत्तम

**देवेंद्र फडणवीस** ३३ व्या महाराष्ट्र राज्य पोलीस क्रीडा स्पर्धा-२०२३ चा समारोप

**पुणे** : महाराष्ट्राच्या पोलीस दलाकडे देशातील सर्वोत्तम पोलीस दल म्हणून पाहिले जाते. राज्यात पोलीस दलाकडून उत्तम प्रकारे कायदा व सुव्यवस्था राखली जात असल्याने राज्य प्रगतीकडे जात आहे, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

राज्य राखीव पोलीस बल क्र. २ मैदान वानवडीत आयोजित ३३ व्या महाराष्ट्र राज्य पोलीस क्रीडा स्पर्धा-२०२३ च्या समारोप प्रसंगी ते बोलत होते. यावेळी पालकमंत्री चंद्रकांत पाटील, आमदार सुनील कांबळे, सिद्धार्थ शिरोळे, भीमराव तापकीर, मेघना बोर्डीकर-साकोरे, राज्याचे पोलीस महासंचालक रजनीश सेठ, मुंबईचे पोलीस आयुक्त विवेक फणसाळकर, पोलीस महासंचालक तथा गृह रक्षक दलाचे महासमादेशक भूषणकुमार उपाध्याय, प्रशिक्षण विभागाचे पोलीस महासंचालक संजय कुमार, अपर पोलीस महासंचालक अनुप कुमार सिंग, पुणे शहरचे पोलीस आयुक्त रितेश कुमार, पिंपरी-चिंचवड शहरचे पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे, राज्य राखीव पोलीस दलाचे अपर पोलीस महासंचालक चिरंजीवी प्रसाद आदी उपस्थित होते.

फडणवीस म्हणाले, कायदा व सुव्यवस्था राखण्यासह लोकशाहीची मूल्ये जपण्याकरता पोलीस दल कार्यरत आहे. विपरीत परिस्थितीत पोलीस कर्मचारी काम करतात. पोलिसांनी कोरोना काळात जीवनाची जोखीम पत्करून प्रचंड काम केले. त्यादरम्यान काही पोलिसांना शहीद व्हावे लागले. अशाही परिस्थितीत सामान्य माणसाचे जीवन सुकर व्हावे यासाठी पोलीस दलाने काम केले, असेही त्यांनी सांगितले.

सेठ म्हणाले, या स्पर्धा अतिशय खेळीमेळीच्या उत्साहात पार पडल्या. पोलीस खेळाडूंच्या क्रीडागुणांना वाव मिळावा, संघभावना वाढावी, आरोग्य निरोगी राहावे, मनोबल वाढावे, यासाठी या स्पर्धा उपयुक्त आहेत. या स्पर्धेत ६ नवीन विक्रम नोंदले गेले. पुण्यात २८ एकर जागेत पोलीस क्रीडा संकुल आणि हॉस्टेल बांधण्याचा प्रस्ताव दिला आहे, असेही त्यांनी केले. प्रास्ताविक अनुप कुमार सिंग यांनी केले. रितेश कुमार यांनी आभार मानले.

### पोलीस दलासाठी क्रीडा संकुल

२०१९ मध्ये पुण्यात पोलीस दलातील खेळाडूंसाठी चांगले क्रीडा संकुल तयार करण्याचा मनोदय पोलीस महासंचालकांनी व्यक्त केला होता. त्यानुसार पोलीस विभागाकडून अत्याधुनिक क्रीडा संकुल आणि वसतिगृह उभारण्याचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. लवकरच त्यास मान्यता देण्यात येईल. बालेवाडी येथे खेळासाठी अत्याधुनिक सुविधा आहेत; पण पोलिसांना चांगल्या सुविधा मिळाव्यात, यादृष्टीने पायाभूत सुविधांची याठिकाणी व्यवस्था करण्यात येईल, असे फडणवीस यांनी सांगितले.

# पोलिस अधिकाऱ्यांना दंड लावावा का?

## पोलिसांना न्यायालयाने फटकारले

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याविरोधात घोषणाबाजी व आक्षेपार्ह वक्तव्ये केल्याबद्दल माजी खासदार व राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आनंद परांजपे यांच्यावर ११ गुन्हे दाखल करणाऱ्या पोलिसांना उच्च न्यायालयाने फटकारले.



मात्र, याप्रकरणी आनंद परांजपे यांना १८ जानेवारीपर्यंत अटक करणार नसल्याचे आश्वासन राज्य सरकारने उच्च न्यायालयाला शुक्रवारी दिले.

११ गुन्हे एकत्रित करण्यासाठी आनंद परांजपे यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. न्या. रेवती मोहिते-डेरे व न्या. पृथ्वीराज चव्हाण यांच्या खंडपीठासमोर या याचिकेवर सुनावणी होती. एकाच स्वरूपाची तक्रार असूनही परांजपे यांच्यावर ११ गुन्हे दाखल केल्याबद्दल उच्च न्यायालयाने पोलिसांना सुनावले. 'दंड ठोठावल्यांवर आणि दंडाची रक्कम त्यांच्या वेतनातून कापण्यात आल्यावर पोलिस धडा शिकतील,' असे उच्च न्यायालयाने म्हटले.

मुख्यमंत्र्यांविरोधात निदर्शन केल्यामुळे परांजपे यांच्यावर ११ गुन्हे दाखल करण्यात आले आहे, असे परांजपे यांचे वकील सुहास ओक यांनी न्यायालयाला सांगितले. सरकारी वकील प्राजक्ता शिंदे यांनी परांजपे यांच्यावर दाखल केलेले सर्व गुन्हे जामीनपात्र असल्याने त्यांनी जामीन अर्ज करावा, असा युक्तिवाद न्यायालयात केला.

११ गुन्ह्यांसाठी जामीन अर्ज का करावा? हे थांबायला हवे. यामध्ये सामान्य माणूस भरडला जात आहे, अशा शब्दांत न्यायालयाने पोलिसांना फटकारले. याचिकेनुसार, ठाण्यात मुख्यमंत्र्यांविरोधात निदर्शन करण्यात आले. त्याप्रकरणी श्रीनगर पोलिस ठाण्यात १२ डिसेंबर २०२२ रोजी परांजपे यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला. त्यानंतर शिंदे समर्थकांनी अन्य १० पोलिस ठाण्यात परांजपेंविरोधात गुन्हा दाखल केला. मात्र, सर्व गुन्हे ठाणे पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीतच दाखल करण्यात आले.

आंदोलकांनी मुख्यमंत्र्यांची प्रतिमा मलिन केली. निदर्शनाचे फोटो समाजमाध्यमांवर अपलोड केले आणि राज्यात अस्वस्थता निर्माण करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप पोलिसांनी केला आहे.

CS CamScanner

CS CamScanner

दि. 14/01/2023

1) पुढारी पान क्र. 6

# रस्ता करासह मिरा-भाईंदर पालिका वास्तुंची भाडेवाढ रद्द करा

## आयुक्त दिलीप ढोले यांच्याकडे भाजप शिष्टमंडळाची मागणी

**भाईंदर : पुढारी वृत्तसेवा**

मिरा-भाईंदर महापालिकेने तत्कालीन प्रशासकीय बैठकीत नव्याने १० टक्के रस्ता कर लागू करण्यासह पालिकांच्या विविध वास्तूंच्या भाड्यात भरमसाठ वाढ केली आहे. हि भाडेवाढ तसेच लागू केलेला नवीन रस्ता कर रद्द करण्याच्या मागणीसाठी भाजपचे माजी आ. नरेंद्र मेहता यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने आयुक्त दिलीप ढोले यांची भेट घेतली.

या बैठकीत शहरातील इतर समस्यांवर सुद्धा चर्चा करण्यात आली. त्यात तत्कालीन प्रशासकीय बैठकीत रस्त्यांवर पार्क करण्यात येणाऱ्या खाजगी वाहनांना पार्किंग शुल्क आकारण्याचा ठराव मंजूर केला आहे. शहरातील अनेक जुन्या इमारतींमध्ये पार्किंगची सोय नसल्याने रहिवाशी त्यांच्या दुचाकी व चारचाकी वाहने नाईलाजाने रस्त्यावरच पार्क करतात. अशा वाहनांकडून पार्किंग शुल्क वसुल करण्यासाठी प्रशासनाने मंजूर ठरावानुसार निविदा प्रक्रीया प्रसिध्द केली आहे. या शुल्काची वसुली सुरु झाल्यास रोज लोकं व ठेकेदारामध्ये वाद निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. याविरोधात लोकं रस्त्यावर उतरल्यास कायदा व सुव्यस्थेच्या प्रश्न निर्माण होईल, अशा इशारा देत ही निविदा प्रक्रिया थांबवून मंजूर ठराव रद्द करण्याची मागणी भाजपच्या शिष्टमंडळाने आयुक्तांकडे केली.

### ...अन्यथा आंदोलन छेडू

पालिकेने बांधकाम टिडिआरच्या माध्यमातून दहिसर चेकनाका येथील सुविधा भूखंडावर भारतरत्न स्व. लता मंगेशकर नाट्यगृह बांधले आहे. हे नाट्यगृह वापराबाबत २६ ऑगस्ट २०२२ रोजीच्या महासभेत ठराव मंजूर केला होता. त्या अनुषंगाने हे नाट्यगृह प्रशासनाने शहरातील नागरीकांना उपलब्ध करून देणे क्रमप्राप्त असताना प्रशासनाने महासभेच्या मंजूर ठरावाप्रमाणे अंमलबजावणी न करता विकासकाकडून सभागृह चालविण्याकरिता कार्यवाही सुरू केली आहे. याखेरीज पालिकेने तत्कालीन महासभेने मंजूर केलेले भाडे आकारून सभागृह प्रशासनामार्फत भाडेतत्वावर लोकांना उपलब्ध करुन द्यावे. विकासकाला सभागृह चालविण्याकरीता देऊ नये अन्यथा भाजप आंदोलन छेडेल, अशा इशारा देण्यात आला.

CamScanner

सर्व देशवासियांना मकर संक्रांतीच्या हार्दिक शुभेच्छा

दैनिक
आमची मुंबई

ठाणे/पालघर येथून एकाचवेळी प्रकाशित.

वर्ष ११ | अंक २६६ | शनिवार १४ जानेवारी २०२३ | Post-Reg-No. PLG/158/2022-2024 | रु. २ | पाने ०८

# हवालदाराचे उत्कृष्ट काम; चालत्या ट्रेनमधून दूर खेचले आणि ट्रेन आणि प्लॅटफॉर्ममधील दरीमध्ये पडण्यापासून वाचले

**वसई.** विरार रेल्वे स्थानकावर आरपीएफ जवानाच्या हतबलतेमुळे एका महिलेचा जीव थोडक्यात वाचला, दोन क्षण जरी उशीर झाला असता तरी चालत्या रेल्वेखाली ही महिला आली असती, या संपूर्ण घटनेचा व्हिडिओ कैद झाला आहे. स्टेशनवर लावण्यात आलेल्या सीसीटीव्हीमध्ये. झाला, जो सध्या सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे, हा व्हिडिओ समोर आल्यानंतर लोक आरपीएफ कॉन्स्टेबलचे जोरदार कौतुक करत आहेत. १२ जानेवारी रोजी कर्तव्यावर असलेल्या RPF हेडकॉन्स्टेबल यामिनीकांत मिश्रा यांच्या उपस्थितीने एका महिला प्रवाशाचे प्राण वाचले, असे वृत्त आहे, हेडकॉन्स्टेबल यामिनीकांत मिश्रा यांनी नेहा मिश्रा (२७) ही महिला प्रवाशी सकाळी ८.०७ वाजता विरारकडे येत असल्याचे निदर्शनास आले. स्थानकाच्या प्लॅटफॉर्म क्रमांक ०२ वर चालती लोकल ट्रेन पकडण्याचा प्रयत्न करत असताना ती घसरली आणि चालत्या



ट्रेनमधून खाली पडली, हेड कॉन्स्टेबल मिश्रा यांनी ताबडतोब कारवाई करत तिला चालत्या ट्रेनपासून दूर खेचले आणि ट्रेनमधील दरीत पडली. आणि प्लॅटफॉम. पासून जतन आरपीएफने महिलेला बाकावर बसवून पाणी प्यायला लावल्याचे प्रवाशांनी सांगितले. मात्र, या घटनेची माहिती संबंधित महिला प्रवाशाच्या नातेवाईकाला देण्यात आली.त्या क्षणी प्रवाशाने हेड कॉन्स्टेबल यामिनीकांत मिश्रा यांनी केलेल्या प्रशंसनीय कार्याबद्दल आरपीएफचे आभार मानले. वेळोवेळी RPF निष्काळजी प्रवाशांना नवीन जीवन देणारे दिसत आहे.

CamScanner

दैनिक
# यशोभूमि

अखिलेश आर. तिवारी

# गृहकर वसूली के लिए मनपा कर रही मनमानी

**विरार (प्रतिनिधि),** वसई-विरार शहर मनपा के गृहकर विभाग ने इस वर्ष गृहकर वसूली के लिए 400 करोड़ का लक्ष्य निर्धारित किया है, लेकिन इस लक्ष्य को पूरा करने के लिए वसूली में लगाये गए कर्मचारी मनमाना रवैया अपना रहे हैं। मनपा बगैर कोई नोटिस जारी किए ही घरों में रह रहे परिवारों को जबरन बाहर निकाल कर घरों को सील कर रही है। ऐसे में घरों से बाहर किये गए परिवारों को अपने बच्चों के साथ खुले आसमान के नीचे ठंड के बीच रात गुजारनी पड़ रही है। ऐसा ही एक मामला नालासोपारा पूर्व के अलकापुरी इलाके में देखने को मिला। ऐसे में सबसे ज्यादा परेशानी उस परिवार को उठानी पड़ रही है, जो किराए का घर लेकर रह रहे हैं। ऐसे ही एक घर में गृहकर वसूली के लिए पहुंचे मनपा कर्मचारियों ने महज 8 हजार रुपये गृहकर बकाएदार को उसके परिवार सहित जबरन बाहर निकाल कर घर को सील कर दिया, इस दौरान वह परिवार मनपा कर्मचारियों से मिन्नतें करता रहा, लेकिन कर्मचारियों ने एक न सुनी और घर को सील कर दिया। एक परिवार ने बताया कि आदमी सुबह नौकरी के लिए निकल जाते हैं, ऐसे हालात में घर के अंदर सिर्फ छोटे-छोटे बच्चे एवं महिलाएं ही रहती हैं। उसी दौरान बगैर नोटिस जारी किए ही दोपहर अचानक मनपा कर्मचारी घर पर पहुंचते हैं और तत्काल गृहकर जमा करने की बात करते हैं। ऐसे हालात में जिनके पास सुविधा होती है, वह तो तत्काल टैक्स जमा कर देते हैं, लेकिन ज्यादातर ऐसे लोग हैं, जिनके पास नकद रुपये नहीं होते और वह वसूली के लिए पहुंचे मनपा कर्मचारी से एक दो दिन की मोहलत मांगते हैं, लेकिन मनपा कर्मचारी उनकी एक नहीं सुनते।

CamScanner

लोकमत

# तलावात अनोळखी व्यक्तीचा मृतदेह

नालासोपारा : वसईच्या गोखिवरे येथील तलावात गुरुवारी दुपारी ४०-४५ वर्षीय व्यक्तीचा मृतदेह तरंगत असलेला आढळला. वालीव पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदनासाठी पाठवला आहे. पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. याबाबत हा मृतदेह कोणाचा, याचा पोलिस शोध घेत आहेत.

Hello Vasai
Page No. 1 Jan 14, 2023
Powered by: erelego.com

CS CamScanner

लोकमत

न्यूज Inbox

# वसईत जाहिरातीच्या सामानाची चोरी

नालासोपारा : वसईत जाहिरातीच्या सामानाची चोरी केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. वसईच्या सातीवली येथील टोयाटो शोरूमजवळ प्रवीण चतुर्वेदी (३७) यांच्या कमर्शियल एडव्हर्टाइजमेंट लागण्यासाठी लागणारे आयबीम, पाइपचा फ्रेम व फ्लॅक्स असा २५ हजारांचा मुद्देमाल २४ डिसेंबर ते ४ जानेवारीदरम्यान चोरट्यांनी चोरून नेला आहे. गुरुवारी वालीव पोलिसांनी चोरीचा गुन्हा दाखल केला आहे.

Hello Vasai
Page No. 1 Jan 14, 2023
Powered by: erelego.com

CS CamScanner

# नायलॉन मांजाचा वापर नको रे बाबा; पतंगाची दोर कापायची की आयुष्याची?

## मिरा-भाईंदर, वसई, विरार पोलिस आयुक्तालय हद्दीत मनाई आदेश

मंगेश कराळे

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** मकर संक्रांत सणाला पतंग उडवले जातात. मात्र, त्यासाठी नायलॉनचा मांजा वापरण्यात येत असल्याने पशु-पक्षी जखमी होण्याबरोबर त्यांचे प्राण जाण्याच्याही अनेक घटना घडतात. कधी हे मांजे माणसांना लागूनही अपघात होतात. हे लक्षात घेत मिरा भाईंदर, वसई, विरार पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीत नायलॉनच्या मांजाची विक्री, साठा आणि वापर यावर बंदी घातली आहे. मुले पतंगाच्या मागे पळतानादेखील अपघातग्रस्त होतात. त्यांच्या जिवाला धोका निर्माण होतो. नायलॉनचा मांजा हा पर्यावरणासाठी हानिकारक असतो. तो लवकर तुटत नाही. तसेच त्याचा नाशही होत नाही. त्यामुळे खबरदारीचा उपाय म्हणून पोलिस आयुक्त मधुकर पांडेय यांनी पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीत नायलॉनचा मांजाची विक्री, साठा आणि वापर यावर बंदी घातली आहे.



### साठा, विक्रीवर बंदी

- नायलॉनचा मांजाची विक्री, साठा आणि वापर यावर बंदी यावर पोलिस आयुक्तांनी मनाई आदेश जारी केले आहे. हा मनाई आदेश २६ डिसेंबर ते २४ फेब्रुवारीपर्यंत लागू राहणार आहे. या आदेशाचे कोणी उल्लंघन केल्यास कारवाई करण्याचा इशारा आयुक्तांनी दिला आहे.

### पक्षी- प्राण्यांसह माणसाला धोका

- नायलॉन मांजा वापरामुळे शहरातील पक्षी- प्राण्यांसह माणसाला धोका आहे. गळा कापणे, चेहरा विद्रुप होणे, नाक, कान व गालावर गंभीर जखमा माणसाला होतात. तसेच दुचाकी वाहनचालक नायलॉन मांजात अडकून अपघातची शक्यता नाकारता येत नाही.

### पोलिस पथकांचा वॉच

- महानगरपालिका क्षेत्राअंतर्गत नायलॉन मांजाचा वापर व विक्री प्रतिबंधित करण्या-करिता जप्ती व दंडात्मक कारवाई करण्या-करिता पथक गठित केले आहे.
- महानगरपालिका, महसूल विभाग व पोलिस विभागाचे नायलॉन मांजा विक्री व वापर प्रतिबंधात्मक उपाययोजना करणेसंदर्भात तपासणी पथक गठित करण्यात आले आहे.

### मांजा ठरतो अपघाताचे कारण

मिळालेल्या माहितीनुसार गेल्या वर्षी मकर संक्रांतीच्या दिवशी झालेल्या पतंगबाजीत वसईत आठ निरागस पक्षी जखमी झाले होते. यात सहा कबुतर, दोन कावळे यांचा समावेश होता.



### कायदेशीर कारवाई होणार

नायलॉन मांजा ऑनलाइन पद्धतीने किंवा कुरिअरद्वारे खरेदी किंवा विक्री व पुरवठा करताना व जवळ बाळगताना आढळल्यास संबंधिताविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येईल, अशी तंबी पोलिस आयुक्त मधुकर पांडेय यांनी दिली आहे.



CamScanner

लोकमत

# बनावट फेसबुक आयडी बनवून महिलेची बदनामी

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : बनावट फेसबुक आयडी बनवून महिलेचा विनयभंग केल्याची घटना समोर आली आहे. पेल्हार पोलिसांनी आरोपीविरोधात गुरुवारी गुन्हा दाखल केला आहे.

नालासोपारा येथे राहणाऱ्या ३२ वर्षीय महिलेकडे आरोपी तरुणाने पंधरा हजारांच्या रकमेची मागणी केली होती. मात्र, महिलेने पैसे देण्यास नकार दिला. या रागातून आरोपीने पीडितेच्या पतीच्या तसेच तिच्या नावे बनावट फेसबुक आयडी बनवून त्यावर महिलेचे अर्धनग्न फोटो व्हायरल केले होते. ते फोटो डिलिट करण्यासाठी आरोपी पुन्हा १५ हजारांची मागणी करत होता. पीडितेच्या मैत्रिणीलाही त्याने फोटो डिलिट करणार नाही, असे सांगत शिवीगाळ केली होती.



CamScanner